# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  ०२/०४/२०२३

## दुखापत

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अप क्र.२३९/२०२३ कलम ३२४,५०४,३४ भादवि | फिचे घरासमोर राहुल नगर बिच्छु टेकडी अमरावती | दि.०१/०४/२०२३ चे २२.३० वा ते २३.०० वा दरम्यान दा.ता.वेळ दि. ०२/०४/२०२३ चे ०२.१५ वा | पंकज बळवंत थोरात धंदा-शेती, रा. राहुल नगर बिच्छु टेकडी अमरावती | १)डोमा गौतम खंडारे वय २५ वर्ष,२)चंदु लोखंडे वय ३२ वर्ष, दोन्ही रा. राहुल नगर बिच्छु टेकडी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी  फिर्यादी जेवण  वगैरे करुन घरी टी.व्ही पाहत बसले होते तेवढ्यात घरा शेजारी राहणारा डोमा गौतम खंडारे व त्याच्या सोबत चंदु लोखंडे दोघेही फिर्यादीचे घरा समोर येवुन डोमा याने फिर्यादीला आवाज  दिला म्हणुन फि. घरा बाहेर आले तर दोघेही दारु पिलेले होते डोमा यांनी फि.म्हटले की, तुम्ही तुमच्या मोबाईलवर माझा फोटो का काढला या कारणावरुन डोमा  व चंदु या दोघांनी फि.सोबत वाद करुन शिवीगाळ केली व चंदु याने फि.चे कॉलर पकडुन फि.ला ओडताण केली व डोमा याने तेथे जमीनीवर पडेला फरशीचा तुकडा उचलुन फि.च्या डोक्यावर मारले त्यामुळे फि.च्या डोक्याला  मार लागुन त्यातुन रक्त निघाले व ते दोघेही तेथुन पळुन गेले त्या दोघावर कडक कार्यवाही व्हावी करिता बयाण देत आहे अशा फिर्यादीचे जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे सिटी कोतवाली अप क्र. १४५/२३ कलम ३५४ (ड), ३५४(अ), २९४(अ),५०९ भादवि | हॉटेल आदर्श ते वेलकम टी पॉइंट पर्यंत अमरावती | घ.ता.वेळ दि.०१.०४.२३ चे २१.००वा<br><br>दाखल ता. वेळ दि.०२.०४.२३ चे ००.२४ वा. | एक महीला | गाडी क्र MH २७ CK २३९३ चा चालक सोबत दोन अनोळखी इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की गुन्हयातील फिर्यादी ही घरकाम करत असुन तिचे पति झोमॉटो मध्ये पार्सल डिलेव्हरी चे काम करतात नमुद घ.ता.वेळी वठिकाणी यातील फिर्यादी हि तीचे पति सोबत कॉटन मार्केट चौक येथे भाजिपाला घेणे करिता दुचाकीवर आली होती. तिचे पतिने भाजिपाला घेतल्यावर त्यांना हॉटेल आदर्श देसी विलायती येथुन एक जेवणाचे ऑर्डर घेउन पोहचवायचे होती ती ऑर्डर घ्याला दोघेही सोबत हॉटेल मध्ये गेले होते ऑर्डर घेउन त्यांचे दुचाकीने हॉटेल आदर्श येथुन कॉटन मार्केट मार्गे जायला निघाले असता तेथुनच पांढ-या रंगाची एक्टीवा क्र MH २७ CK २३९३ वर बसलेल्या तीन मुलांनी त्याचा वेलकम टी पॉईंट पर्यंत सतत पाठलाग केलर दरम्यान त्या तिनही अनोळखी मुलांनी त्यांच्या दुचाकीने फिर्यादीचा सतत पाठलाग करुन घानरडे इशारे करतच होते. गाडी वरील मुले तेथुन पळुन गेले फि. यांनी झोमॅटोची ऑर्डर पोहचवल्यावर नमुद अनोळखी गाडी चालक व त्याचे दोन सोबती यांचे विरुध्द रिपोर्ट देणे करीता पोस्टेला आली अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट डि.ओ. सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल केला. |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | नांदगावपेठ अप क्र १२३/ २०२३ कलम ४५४,४५ ७,३८० भादवी | राहते घरी,अमरावती | दि. २६/०३/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान दि. ०१/ ०४/२०२३ चे २० /०० वा. दा.तो.वेळ दि. ०२/०४/२०२३ चे १२/५४ वा. | एक महीला | अज्ञात इसम | हकीकत कशा प्रकारे आहे की , यातील फिर्यादी नमुद घ ता वेळी व ठिकाणी दि.२६/०३/२०२३ रोजी १४/०० वा कुटुबासह नागपुर येथे गेले होते.माझे घरी माझा भाऊ नामे महेद्र साहेबराव पावडे रा.महीद्रा काँलनी अमरावती रोज सांयकाळी घरासमोरील झाडांना पाणी टाकण्यासाठी गेत होता.त्याला दि.०१/०४/२०२३ रोजी घराचे दरवाजाचे कडीकोंडा तुटलेला दिसला .म्हणुन त्याने घराचा दरवाजा उघडुन आत पोहीले असता घरातील लोखंडी कपाट तुटलेले व घरातील सामान अस्तव्यस्त पडलेले दिसले.त्यांनी मला फोन करुन सदर बाबत माहीती दिली असता आज रोजी मी घरी येवुन पाहीले.तेव्हा मला लोखंडी कपाटाच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवलेले माझे सोन्याचे दागिने क्र (१) मिनी पोत १० ग्रंम (२) मिनी पोत १४ ग्रॅम (३) कानातील वेल व कुंडल १४ ग्रॅम (४)कानातील कुंडल ५ ग्रॅम (५) कानातील कुंडल ५ ग्रॅम (६) आंगठी ५ ग्रंम (७) आंगठी ४ ग्रॅम व (८) सोन्याचा खडा १० ग्रॅम असे एकुण ६५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने कि. अं. २,५०,००० रु.किमतीचे चोरीला गेल्याचे माझ्या लक्षात आले.कोणीतरी अज्ञात इसमाने सदरचे दागिने चोरी केले आहेत.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २. | | | | | | |
| ३. | पोस्टे राजापेठ ३३२/२०२३ कलम ३७९ भादंवि | अंबाविहार कॉलनी आदीवासी हॉस्टेल जवळ अमरावती | दि. २९/३/२२३ चे २३/३० वा ते दि ३०/०३/२३ चे ००/३० वा . दा. ता. वेळ दि. ०२/०४/२३ चे १३/०८ वा. | राजु मारोतराव महात्मे वय- 48 ,रा.- अंबाविहार कॉलनी आदीवासी हॉस्टेल जवळ अमरावती | अज्ञात | थौडक्यात हकीकत असा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकानी यातील अज्ञात आरोपीतांनी फीर्यादीचे घरा समोर उभ्या असलेल्या दुरुस्ती साठी खोलुन ठेवलेल्या ट्रक्टरची बॅटरी कि.अं. ९००० रु चा चोरुन नेली , अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल केला. |

## अपघात

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे राजापेठ ३३३/२०२३ कलम २७९,३३७, ४२७ भादवी | नंदा शोरुम समोर ,नवाथे बडनेरा रोड, अमरावती | दि. ०२/०४/२३ चे १२/४५ वा<br><br>दा. ता. वेळ दि. ०२/०४/२३ चे १३/५३ वा. | धीरज ढालचंद लालवानी वय-३७, रा.- रामपुरी कँम्प झुलेलाल लाईन हनुमान नगर समोर अमरावती | सागर सुनील दंडारे वय- २४ रा.-महीरम पुरा अचलपुर जि. अमरावती चा चालक ट्रक क्र.- एम एच ३१, ए.पी. ३३३८ | थोडक्यात हकीकत असा प्रकारे आहे की यातील फार्यादी यांचे कुटुंबीय व पाहुण्यासोंबत स्वतचे कार क्र. एम.एच. २७ बि.यु. ८४७३ ने बडनेरा कडुन राजापेठ कडे येत असतांना मागुन भरधाव वेगाने आलेला ट्रक क्र. ट्रक क्र.- एम एच ३१, ए.पी. ३३३८ ने तिन वेळा धडक देवुन अं. १,५०,००० रु. चे नुसान केले व दुखापत केले, अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## ईतर

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शाहर अप क्र.२४०/२०२३ कलम १२२ म.पो.का. अप | महादेव खोरी गजानन्न नगर रोडवरिल पाटील किराणा दुकाना जवळ अमरावती | दि.०२/०४/२०२३ चे ०३.३० वा दा.ता.वेळ दि.०२.०४.२०२३ चे ०६.३४ वा | सरतर्फे पोहेकॉ सुनिल सोळंके ब.नं.२८९ पो.स्टे. प्रेजरपुरा अम.शहर | प्रज्वल काटगडे वय २३ वर्ष,रा. मंगलधाम कॉलनी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टॉफसह पो.स्टे. हद्दित पेट्रोलींग करि असता नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा सुर्योदय व सुर्यास्तव दरम्यान स्वताचे चेगरा दुपट्याने बांधुन चोरी करण्याचे उद्देशाने संयसास्पद स्थितीत लपवुन बसलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन कलम १२२ म.रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल केला. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शाहर अप क्र.२४१/२० २३ कलम ३०६,३४ भादवि | अमरावती | दि.०२.०४.२०२३ चे ०२.०५ वा<br><br>दा.ता.वेळ दि.०२.०४.२०२३ चे १०.१० वा | अब्दुल आरिफ अब्दुल आसिम वय २७ वर्ष, धंदा-मजुरी रा. भातकुली शरद पवार नगर जि.अमरावती | १) शेख आसिम<br>२) शेख करीम<br>३) २ महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी पो.स्टे. ला येवुन जबानि रिपोर्ट दिला की, त्यांची लहान बहिण मृतक अमरावती हीचे दि.२८/०१/२०२१ रोजी समाज चे रितिजावाजा प्रमाणे लग्न झाले असुन तीला दोन मुली आहे. सासरचे हे दोन वर्षा पर्यंत तीचे शी चागले वागले नंतर तीचा पति दारु पिवुन येवुन तीला शिवीगाळ व मारपीठ व त्रास देत होता आणि सासरे व ननंद मिळुन तीला मानसिक व शारीरीरक त्रास देत होते. जेव्हा ती माहेरी येत होती तेव्हा तीने सांगीतले होते की, मला सासरची मंडळी हे मारपिठ करतात व त्रास देतात कीती वेळेस तीने फोनवर सुध्दा सांगीते होते जेव्हा माझ्या बहीनीला दुसरी मुलगी झाली तेव्हा तीचा नवरा हा तिच्याशी नेहमी भांडण करत होता व मारपीठ करिता होता. माझ्या बहिनीचे दि. ३०.०३.२०२३ रोजी दुपारी ०१.४३ वा फोन करुन म्हाणाली की मला घेवुन जा तो फोन माझी मोठी बहीन हीने उचलला होता तेव्ही माझ्या वडिलांना अमरावती ला सायंकाळी ०५.०० वा पाठविले व सायंकाळी ७.०० वा ते ०८.०० वा दरम्यान माझ ो वडिल हे घरी आले असता त्यांनी सांगीतले की, माझ्या छोट्या बहिनीचा पतिने वडिलाना पाहुन तीला थाप्पड मारली व तो निघुन गेला तसेच माझे बहिनीचे सासरे, सासु व ननंद यांनी भांडण करुन हीला घेवुन जायचे असेल तर नेहमी साठी घेवुन जा व आमचे घर खाली करा तेव्हा माझ्या वडिलांनी हिला घरी चालण्या म्हटले असता तीने म्हटले की, माझे पति हे बाहेर गेले आहे आहे ते आल्यानंतर मी स्वतहा येवुन जाईल असे म्हटले असता माझे वडिल यांनी घरी आल्यानंतर दि. ०१/०४/२०२३ रोजी माझे मोठी बहिन हिला फोन करुन सांगीतले की तीचा पति, सासरे सासु व ननंद यांनी म्हटले की, घर खाली करदो व घरुन निघुन जा असे म्हणुन सर्वांनी माझ्याशी भांडण केले आहे मला मानसिक त्रास देत आहे असे सांगीतले होते. दि.०२/०४/२०२३ रोजी रात्री ०२.०० वा ते ०५.०० वा दरम्यान माझे जवाई शेख मुस्ताक शेख रज्जाक यांच्या मोबाईलवर माझ्या बहिनीची ननंद ने फोन करुन सांगीतले की,माझी छोटी बहिण हिने फाशी घेतली आहे तेव्ही मी अमरावती येथील विद्याभारती कॉलेज मध्ये कामकरित होतो मला माझ्या जवाई यांचा फोन आला आणि त्यांनी सांगीतले की, इर्विन दवाखाना येथे नेले आहे मी सुध्दा इर्विन दवाखाना येथे पोहचलो तोव्हा माझ्या बहिणिचा मृत्यु झाला होता आणि तीचे गळयाला दोरीचे निशान दिसत होते काही वेळाने नातेवाईक सुध्दा इर्विन दवाखाना येथे पोहचले. माझी बहिन मृतक हीला तीच्या पतिने,सासरे, सासु व ननंद यांनी मिळुन मानसिक व शारिरिक त्रास देवुन मरण्यास मजबुर केले आहे त्याच्यावर कार्यवाही करिता रिपोर्ट देत आहे अशा फिर्यादीच्या जबाणि रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल केला. |

## प्रोव्हीशन रेड

| अ. क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ६ | ७ | ९ | १० | १२ |
| १. | फ्रेजरपुरा अप. न. २४२/२० २३ क. ६५(ई) मदाका | शिवएकता चौक अमरावती | दि.०२.०४.२० २३ चे १२.४५ वा दि. ०२. ०४.२०२३ चे १४.२७ वा | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास ब.नं.१०१५ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर | भोलासिंग अजाबसिंग टाक वय २६ वर्ष,रा. सुदर्शन नगर वडाळी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी पो.स्टे. स्टॉफ सह व.पो.नि.सा.यांचे आदेशाने पो.स्टे. हद्दित पेटोलींग करित असतांना गुप्त बातमीदारा कडुन खात्रीलायक खबर मिळाले वरुन नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी आरोपी ाचे वर प्रो रेड केली असता पंचासमक्ष त्याचे ताब्यातुन १० लिटर गावठी हातभट्टी दारु किं. अं.२०००/-रु.चा जप्त करण्यात आला नमुद मुद्देमाल आरोपी याचे कलम ६५(ई) म.दा.का. प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल केला. |